पंचायत राज संस्थांनी त्यांच्या
स्वउत्पन्नातुन ५% निधीतून
घ्यावयाच्या अपंग
कल्याणासाठी योजना व
खर्चाबाबत मार्गदर्शक सुचना

# महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक: जिपऊ-२०२०/प्र.क्र.५४/वित्त-३

बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड

फोर्ट, मुंबई-४००००१.

तारीख: २६ मे, २०२०

संदर्भ :-

१) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २००७/प्र.क्र.४८७१/वित-३, दि.५ आक्टोबर, २०१२
२) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २००७/प्र.क्र.४८७१/वित-३, दि.२५ जून, २०१४
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे परिपत्रक क्र: अपंग २०१५/प्र.क्र.५५/अ.क.२, दि. १८/११/२०१५
४) शासन निर्णय क्रमांकः अपंग २०१५/प्र.क्र.१३७/वित-३, दि.२४ नोव्हेंबर, २०१५
५) शासन निर्णय क्रमांकः व्हीआयपी २०१६/प्र.क्र.२४/वित-३, दि.५ एप्रिल, २०१६
६) शासन निर्णय क्रमांकः व्हीआयपी २०१६/प्र.क्र.२४/वित-३, दि.२८ एप्रिल, २०१६
७) शासन निर्णय क्रमांकः व्हीआयपी २०१६/प्र.क्र.११०/वित-३, दि.२१ सप्टेंबर, २०१६
८) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक: डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दि. ५डिसेंबर, २०१६
९) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अ.शा. पत्र क्रमांक: अपंग २०१७/प्र.क्र.५/अ.क.२, दि. २८.४.२०१७
१०) मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ३१.१०.२०१७ रोजीची बैठक
११) शासन निर्णय क्र: जिपऊ २०१८/प्र.क्र.५४/वित्त-३, दि. २५ जून, २०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम -१९६१ मधील अनुसूची-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातुन जिल्हा परिषदे तर अनुसुची-२ मध्ये नमूद केल्यानुसार पंचायत समितीच्या स्वउत्पन्नातुन पंचायत समितीने वेगवेगळ्या कल्याणकारी योजनावर खर्च करावयाचा आहे. त्यानुसार, विभागाने शासन निर्णय क्रमांक : जिपऊ २०१८/प्र.क्र.५४/वित्त-३, दि. २५ जून, २०१८अन्वये, पंचायत राज संस्थांनी त्यांच्या स्वउत्पन्नातुन ५% निधीतून घ्यावयाच्या अपंग कल्याणासाठी योजना व

खर्चाबाबत मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक: डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दि. ५डिसेंबर, २०१६ अन्वये, विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळणा-या लाभाचे हस्तांतरण, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. यानुसार, अपंग व्यक्तींच्या वैयक्तिक लाभाच्या योजनेत अन्न व खाद्य पदार्थ या जिवनावश्यक वस्तुचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. याबाबत खालीप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या स्वउत्पन्नाच्या ५% निधीमधून अपंगासाठी राबविण्यात येणा-या विकासाच्या योजना संदर्भाधिन शासन निर्णय क्रमांक ११ मधील परिच्छेद-१ मधील ब) वैयक्तिक लाभाच्या योजना- यामध्ये अनुक्रमांक ३६ वर खालीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

"अपंग व्यक्तींच्या वैयक्तिक लाभाच्या योजनेत अन्न व खाद्य पदार्थ या जिवनावश्यक वस्तुचा पुरवठा करणे."

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक <२०२००३२०१७४६०९०८२०> असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अरविंद कुमार)
अतिरिक्त मुख्य सचिव

प्रत,

१. [मा. राज्यपालांचे सचिव]

२. [मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ]

३. [सर्व मा.मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई]

४. [मा. विरोधी पक्ष नेता( विधान सभा) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई]

५. [मा. विरोधी पक्ष नेता( विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई]

६. [सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई]